निर्णय क्र. मविनिआ/माअअ/२०२४/अपील/०७/२०२४/323 दिनांकः ३०.०५.२०२४

| | | |
|---|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : | ०१.०४.२०२४ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | : | २९.०४.२०२४ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | : | ०७.०५.२०२४ |
| प्रथम अपील निकाली काडल्याचा दिनांक | : | ३०.०५.२०२४ |

**सक्षम प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत)**

**अपील क्र. ०७/२०२४**

श्री. चंदू विजय पाटील ... **अपीलकर्ता**

**विरुद्ध**

जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई ... **प्रतिवादि**

**आपीलाचे तथ्यः-**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.०३.२०२४ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक ०१.०४.२०२४ रोजी प्राप्त झाला. आपीलार्थी यांच्या दिनांक ३०.०३.२०२४ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत दाखल केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९.०४.२०२४ रोजी चे पत्रांन्वये समाधानकारक माहिती न पुरवल्यामुळे आपीलार्थी यांनी दिनांक ०६.०५.२०२४ रोजी त्याच माहितीसाठी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केले. (अर्ज प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक ०७.०५.२०२४ रोजी प्राप्त झाला).

प्रथम आपीलीय अधिकारी यांनी आपीलार्थी यांना दिनांक १०.०५.२०२४ रोजी नोटिस पाठवून दिनांक २९.०५.२०२४ रोजी अर्जा वर सुनावणी आयोजीत केली होती. दिनांक २९.०५.२०२४ रोजी सुनावणी साठी आपीलार्थी व जन माहिती अधिकारी हजर झाले व त्यांनी सुनावणी दरम्यान मौखिक निवेदन सादर केले.

**अपीलातील निवेदवारून आपिलातील मुद्दे खालील प्रमाणे आहे:-**

**मागीतलेली माहिती :**

मा. उच्च न्यायालय मुंबई, यांचे नागपूर खंडपीठ यांच्या न्यायालयातील जनहित याचिका क्र. ७०/२०१७ मध्ये दिनांक ३१/०८/२०१७, ०५/०४/२०१८ व दिनांक २७/०६/२०१८ मध्ये प्रतिवादी क्र. ४ महावितरण (MSEDCL) यांना दिलेल्या सुधारित आदेशांची अंमलबजावणी होण्याकामी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्या कार्यालयाने शासनाच्या प्रचलित नियमानुसार काढलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या परिपत्रकाची प्रत मिळण्याबाबत.

१. अर्जासोबत जोडलेल्या व मा. उच्च न्यायालयासमोर २०२३ च्या सुओ-मोटू रिट याचिका क्रमांक २ मध्ये दिनांक ३०/११/२०२३ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी होण्याकामी ज्या कायदा व नियमाप्रमाणे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्या कार्यालयाने दिनांक २६/१२/२०२३ रोजी मार्गदर्शक तत्वांचे परिपत्रक काढले होते. त्याच कायदा व नियमाप्रमाणे मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे नागपूर खंडपीठ यांच्या न्यायालयातील जनहित याचिका क्र. ७०/२०१७ मध्ये दिनांक ३१/०८/२०१७, ०५/०४/२०१८ व दिनांक २७/०६/२०१८ मध्ये प्रतिवादी क्र. ४ महावितरण (MSEDCL) यांना दिलेल्या सुधारित आदेशांची अंमलबजावणी होण्याकामी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्या कार्यालयाने शासनाच्या प्रचलित नियमानुसार काढलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या परिपत्रकाची प्रत देण्यात यावी.

२. तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे नागपूर खंडपीठ यांच्या न्यायालयातील जनहित याचिका क्र. ७०/२०१७ मध्ये दिनांक ३१/०८/२०१७, ०५/०४/२०१८ व दिनांक २७/०६/२०१८ मध्ये प्रतिवादी क्र. ४ महावितरण (MSEDCL) यांना दिलेल्या सुधारित आदेशांची अंमलबजावणी होण्याकामी मार्गदर्शक तत्वांचे परिपत्रक काढण्याचे काम महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्या कार्यालयातील ज्या तत्कालीन अधिकाऱ्यांकडे होते त्या तत्कालीन अधिकाऱ्यांचे नाव, पदनाम व हुद्दयाची माहिती देण्यात यावी.

३. तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे नागपूर खंडपीठ यांच्या न्यायालयातील जनहित याचिका क्र. ७०/२०१७ मध्ये दिनांक ३१/०८/२०१७, ०५/०४/२०१८ व दिनांक २७/०६/२०१८ मध्ये प्रतिवादी क्र. ४ महावितरण (MSEDCL) यांना दिलेल्या सुधारित आदेशांची अंमलबजावणी होण्याकामी मार्गदर्शक तत्वांचे परिपत्रक काढण्याचे काम विहित मुदतीत केले / झाले नसल्यास महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्या कार्यालयातील संबंधित तत्कालीन अधिकाऱ्यावर ज्या कायद्याने, परिपत्रकाने, नियमाने व राजपत्राने कारवाई होते त्यांच्या प्रती मिळाव्यात.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर:**

१. संबंधित माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध नाही.

२. सदर माहिती या कार्यालयाशी संबंधित नाही.

३. सदर माहिती या कार्यालयाशी संबंधित नाही.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण:**

जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक माहिती उपलब्ध करून दिल्या नसल्याकारणाणे.

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे:**

सदर अपीलामध्ये विचारण्यात आलेली माहिती महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवाना धारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालिटी) विनियम, २०२१ संबंधी आयोगाने प्रसिद्ध केलेल्या कार्यप्रणाली निर्देशासंबंधी असल्याचे निदर्शनास आले. सदर कार्यप्रणाली निर्देश www.merc.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

ग्राहक तक्रार निवारण करण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडून ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम, २०२० तर्फे मंच उपलब्ध करून दिलेला आहे. गाऱ्हाणे निवारण मंचाच्या कार्यपद्धतीची माहिती www.merc.gov.in या संकेत स्थळावर सविस्तररित्या उपलब्ध करून दिलेली आहे.

त्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांनी ग्राहकांसाठी त्यांच्या तक्रारी मांडण्यासाठी ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २०२० अंतर्गत उपलब्ध करून दिलेल्या मंचा चा उपयोग करण्यासाठी कळविण्यात येत आहे.

शिवाय, मुद्दा क्रमांक दोन व तीन संबंधित माहिती कार्यालयात उपलब्ध नाही ही वस्तुस्थिती आहे.

त्यानुसार सदर अपील नामंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम आपीलीय अधिकारी यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०००३२ येथे अपील दाखल करू शकता.**

निर्णय

**अपील नामंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.**

(आभिजीत चाटुफळे)

**उप संचालक (प्रशासन व वित्त) तथा प्रथम आपीलीय अधिकारी**

प्रती,

श्री. चंदू विजय पाटील,
मनवेलपाडा रोड, मीठबाव वाडी,
जीवदानी प्लाझा इमारती समोर,
विरार (पूर्व), ता. वसई.
जि. पालघर पिन – ४०१३०५.

(आभिजीत चाटुफळे)

**उप संचालक (प्रशासन व वित्त) तथा प्रथम आपीलीय अधिकारी**

प्रत,

जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई